# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

१३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५

दूरध्वनी क्र. : (०२२) २२१६ ३९६४ / ६५ / ६९, फॅक्स क्र. : (०२२) २२१६ ३९७६

ई-मेल : mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.merc.gov.in / www.mercindia.org.in


जाहिरात क्र. : १५/२०१५-१६

## जाहीर सूचना

## आर्थिक वर्ष २०१५-१६ साठी नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराच्या प्रारुप आदेशावर अभिप्राय मागविण्याबाबत

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाचा (मविनिआ) आर्थिक वर्ष २०१५-१६ करिता (२०१५ चे प्रकरण क्र. १३५) महाराष्ट्रातील नूतनशील ऊर्जा तंत्रज्ञानाकरिता सामान्य (जेनेरिक) वीज दराचा प्रारुप आदेश आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

या प्रारुप आदेशावर, आयोग लेखी अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती मागवित असून, त्या ६ (५+१) प्रतींमध्ये, आयोगाचे सचिव यांना, मविनिआ, १३ वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५, येथे व्यक्तिशः किंवा पोस्टाने, किंवा फॅक्स किंवा ई-मेल (फॅक्स : (०२२) २२१६ ३९७६, ई-मेल : mercindia@merc.gov.in) द्वारा दि. २३ डिसेंबर, २०१५ पर्यंत कृपया पाठविण्यात याव्यात.

या अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकतींवर पाठविणाऱ्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेलचा पत्ता, असल्यास, देण्यात यावा. जर कोणत्याही संस्था किंवा ग्राहक वर्गवारीच्या वतीने या अभिप्राय, सूचना आणि / किंवा हरकती पाठविण्यात येत असतील तर तसे नमूद करण्यात यावे. पाठविणाऱ्या व्यक्तीला आपले म्हणणे व्यक्तिशः मांडावयाचे असेल तर तसे देखील त्यामध्ये नमूद करावे. अशा प्रकरणी सदर व्यक्तीला, सेंट्रम हॉल, १ला मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५ येथे बुधवार, दि. २३ डिसेंबर, २०१५ रोजी, सकाळी ११.३० वाजता होणाऱ्या जाहीर सुनावणीमध्ये, त्याचे म्हणणे मांडण्याची संधी आयोगाकडून देण्यात येईल. त्यासाठी वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

स्वाक्षरी/-

दिनांक : ०२.१२.२०१५

ठिकाण : मुंबई

सचिव, **मविनिआ**